


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक


● वर्ष : ०२ ● अंक : १७९ ● पुणे ● गुरुवार, दि. २१ मे २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




## अतिक्रमणे हटवा; आरक्षित जागा ताब्यात घ्या

### आमदार योगेश टिळेकर यांची मागणी; गुरुवार पेठेतील अतिक्रमणांविरोधात सकल हिंदू समाजाचा रास्ता रोको

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"गुरुवार पेठेतील मिर्झा मशीद ट्रस्ट, रजाशाह हॉल दर्गा, बलवार आळी जोग दर्गा, हजरत सिद्दीक शाह मौला दर्गा येथील अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई करून येथील आरक्षित जागा पुणे महानगरपालिकेने तात्काळ ताब्यात घ्याव्यात," अशी मागणी विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांनी केली. या अतिक्रमणांवर तात्काळ कारवाई केली नाही, तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

अतिक्रमणांविरोधात व हिंदूंवरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या वतीने आमदार योगेश टिळेकर यांच्या नेतृत्वात भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शिवाजी रस्त्यावरील फडगेट पोलीस चौकीसमोर हजारो हिंदू बांधवांनी रस्त्यावर ठिय्या देत आंदोलन केले. विविध हिंदू संघटना, संस्थांचे कार्यकर्ते मोठ्या



संख्येने उपस्थित होते. महापालिका प्रशासन लेखी निवेदनाद्वारे पंधरा दिवसात आरक्षित जागा ताब्यात घेऊ, असे आश्वासन देत नाही, तोवर रास्ता रोको सुरूच ठेवणार, अशी भूमिका घेतल्याने वाहतूकही खोळंबल्याचे पाहायला मिळाले. जवळपास अडीच ते तीन तास रास्ता रोखून धरला.

योगेश टिळेकर म्हणाले, "हा लढा कोणत्याही दर्ग्याच्या विरोधात नाही. मात्र, त्याच्या आडून इथे होत असलेली अतिक्रमणे आणि त्यातून घडणाऱ्या राष्ट्रविरोधी घटना रोखण्यासाठी हा जनआक्रोश आहे. या परिसरात महानगरपालिकेचे भाजी मंडईचे आरक्षण आहे. मात्र, ४० वर्षांपासून पालिका येथील अतिक्रमणांवर कारवाई करत नाही व आरक्षित जागा ताब्यात घेत नाही. ही जागा ताब्यात घेऊन येथे नागरिकांसाठी भाजी मंडई उपलब्ध करून द्यावी. महापालिका प्रशासन दुर्लक्ष का करतेय, याचे उत्तर आम्हाला मिळाले पाहिजे."

"महापालिका प्रशासनाने हा प्रश्न गांभीर्याने घेत तात्काळ कारवाई करावी. प्रत्येकवेळी पोलिसांना पुढे करून महापालिकेने याकडे दुर्लक्ष करू नये. अतिक्रमणे आणि त्याबरोबर होणाऱ्या राष्ट्रविरोधी घटनांना आळा घालण्यासाठी येथील हिंदू समाज जागरूकपणे रस्त्यावर उतरून आंदोलन करेल," असेही योगेश टिळेकर यांनी नमूद केले.

दरम्यान, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन याप्रकरणी योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर योगेश टिळेकर आणि सकल हिंदू समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन संपल्याचे जाहीर करत सर्व हिंदू बांधवाना शांततेने घरी जाण्याचे आवाहन केले. पोलिसांच्या सहकार्याबद्दल टिळेकर यांनी त्यांचेही आभार मानले.

## वैष्णवीच्या चारित्र्यावर बोट

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात आज पुण्यातील न्यायालयात सुनावणी पार पडली. हगवणे कुटुंबीयांना न्यायालयासमोर हजर करण्यात आलं होतं. यावेळी हगवणेंच्या वकिलांनी कोर्टात अजब युक्तिवाद केला आहे. यावेळी त्यांनी वैष्णवीच्या चारित्र्यावर संशय घेतला आणि म्हटले की, 'तिच्या मोबाईलमध्ये आक्षेपार्ह चॅट सापडले आहेत.' तर वैष्णवीची प्रवृत्तीच आत्महत्या करण्याची होती, असा मोठा दावाही वकिलांनी केला आहे. या दाव्याला कस्पटेंनी प्रत्युत्तर दिले आहे. 'विश्वास नव्हता तर का लग्न केलं. म्हणजे पैसे पाहूनच लग्न केलं ना तुम्ही,' असा आक्षेप वैष्णवीच्या वडिलांनी घेतला.

सुनावणीनंतर वैष्णवीचे वडिल अनिल कस्पटेंनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना वकिलांच्या युक्तिवादाबद्दल विचारले असता ते म्हणाले, 'दोन-तीन कानाखाली मारल्यावर अंगावर एवढ्या खुणा दिसतात का?' असा प्रतिप्रश्न त्यांनी केला आणि पुढे म्हणाले, चॅट सापडलं असं हे म्हणतात, पण पोस्टमॉर्टम रिपोर्टनुसार सहा दिवस मारहाण झाली, त्याच्या खुणा सापडल्या आहेत. सहा दिवस तुम्हाला चॅट सापडत होते, मग तुम्ही काय करत होते.



कस्पटेंनी पुढे नमूद केले की, हे चॅट सापडल्यावर मारहाण झाली म्हणतात पण, २०२३ च्या आधीही तिला मारहाण झालेली आहे. त्यांच्या घरी आमची बैठकही झाली होती. कोणीही घरंदाज माणूस पोलीस चौकीत जात नाही. आम्ही त्यांना जाब विचारायला घरी गेलो होतो. प्रेमविवाहच होता तर चारित्र्यावर संशय घेण्याचं काय कारण होतं. विश्वास नव्हता तर का लग्न केलं? याचा अर्थ पैसे पाहूनच लग्न केलं ना तुम्ही. प्रकरणाला वेगळं वळण देण्याचा प्रयत्न सुरु आहे. आमचा आमच्या मुलीवर पूर्ण विश्वास आहे, असेही कस्पटे म्हणाले.

वैष्णवीने सासरच्यांच्या जाचाला कंटाळून १६ मे ला आयुष्य संपवले होते. याप्रकरणी तिचा पती शशांक, सासरे राजेंद्र, सासू लता, नणंद करिश्मा, दीर सुशील यांना अटक करण्यात आली आहे. तिचे सासरे तर पाच दिवस फरार होते. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आणि आज पाचही जणांना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. यावेळी सरकारी वकिलांनी युक्तिवाद केला की, हगवणे कुटुंबाची एकत्रित चौकशी करायची असल्याने त्यांची पोलीस कोठडी वाढवून मिळावी. पण हगवणेंच्या वकिलांनी मात्र थेट वैष्णवीच्या चारित्र्यावर बोट ठेवले, 'वैष्णवी एका व्यक्तीसोबत चॅट करायची. ते चॅट पकडण्यात आलं होतं,' असा गंभीर दावा त्यांनी केला.

## रूपाली चाकणकर नकोच : तृप्ती देसाई

**सांगली (दै. आरंभ पर्व)**

राज्यात महिला असुरक्षित असल्याचे विविध घटनांवरुन समोर येत असल्यामुळे परिस्थिती गंभीर आहे. सध्या हुंडाबळीतील आरोपींना जामिन मिळतो आणि ते बाहेर उजळ माथ्याने फिरतात. राजकीय पक्षाशी संबंधित असलेल्या रुपाली चाकणकर या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष असून महिलांना न्याय मिळत नाही. त्यांना तातडीने पदमुक्त करा. पक्षविरहित चेहरा द्या अन्यथा पदरिक्त ठेवा, अशी मागणी भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी पत्रकार बैठकीत केली. देसाई म्हणाल्या, 'मागील सत्ताकाळापासून महिला आयोगाच्या अध्यक्षपदी रुपाली चाकणकर या आहेत. वास्तविक महिला आयोग ही स्वायत्त संस्था



असल्यामुळे त्याच्या अध्यक्षपदावर राजकीय पक्षाशी संबंधित कोणत्याही व्यक्तीला राहता येत नाही. परंतु राष्ट्रवादी पक्षाशी संबंधित चाकणकर यांच्याकडे अध्यक्षपदाचा कार्यभार दिलेला आहे. तो बेकायदेशीर आहे. करुणा मुंडे, वैष्णवी हगवणे आदी प्रकरणांचे काय झाले हे राज्यापुढे आहे. सत्ताधारी पक्षाशी संबंधित संशयित असतील तर त्यांना पाठीशी घालण्याचा प्रकार आयोगाच्या माध्यमातून सुरु आहे. हुंडाबळी कायदा कागदावर अस्तित्वात आहे परंतु त्या कायद्यानुसार किती दोषींना शिक्षा झाली याची आकडेवारी आयोगाने जाहिर करणे गरजेचे आहे.' देसाई यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक केले. त्या म्हणाल्या, 'मुख्यमंत्री हे कार्यक्षम अधिकारी आहेत. परंतु प्रशासकीय अधिकारी सक्षम नाहीत. त्यामुळे अन्याय झालेल्या महिलांना न्याय मिळत नाही. वैष्णवी प्रकरणानंतर विविध जिल्ह्यातून अन्यायाची प्रकरणे माझ्याकडे येत आहेत. त्यांना न्याय मिळण्यासाठी मी मुख्यमंत्र्यांची भेट घेवून त्यांच्याकडे वस्तुस्थिती मांडणार आहे. लाडक्या बहिणींना सुरक्षा मिळालीच पाहिजे.'

## ठळक बातम्या

### पुण्यात पावसाची विश्रांती

पुणे (आरंभ पर्व) : गेले काही दिवस शहर आणि परिसरात सातत्याने पाऊस पडला. मात्र, बुधवारी पावसाने विश्रांती घेतल्याचे दिसून आले. आता पुढील दोन दिवस मध्यम स्वरुपाची, तर घाट परिसरात मुसळधारेची शक्यता आहे. त्यानंतर शुक्रवारपासून दुपारच्या सुमारास ढगाळ वातावरण, हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मोसमी वारे पुण्यात दाखल झाल्याचे हवामान विभागाने सोमवारी जाहीर केले. मात्र, मंगळवारपासून पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. बुधवारी सकाळी ऊन पडले होते. दिवसभरात काही तुरळक सरी पडल्या. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार बुधवारी रात्री नऊपर्यंत शिवाजीनगर येथे ७.२, लोहगाव येथे १७.६, चिंचवड येथे ७, मगरपट्टा येथे १७, कोरेगाव पार्क येथे १०, तर एनडीए येथे एक मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

### दोन तरुणींची आत्महत्या

पुणे (आरंभ पर्व) : विवाहाचे आमिष दाखवून फसवणूक झाल्याने दोन तरुणींनी आत्महत्या केल्याच्या घटना हडपसर आणि वाघोली येथे घडल्याचे उघडकीस आले आहे. विवाहाच्या आमिषाने फसवणूक केल्याने एका १७ वर्षीय युवतीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागातील फुरसुंगी परिसरात घडली.








# फडणवीस, शिंदेंवर टीका; पात्रता तरी आहे का?



दि. २६ मे २०२५ रोजी मुंबई, ठाणे, रायगड, कोकणाला मुसळधार पावसाने अक्षरश: झोडपून काढले आणि राज्याची राजधानी असलेल्या मुंबईचे जनजीवन ठप्प झाले. मुंबईत सर्वत्र दोनशे ते अडिचशे मिमी पाऊस कोसळला आणि राजधानीतील रस्ते व रेल्वेचे मार्ग पाण्याखाली गेले. खरे तर जोरदार पावसानंतर मुंबईचे जनजीवन विस्कळीत होते हे काही नवीन नाही. त्याची मुंबईकरांना संवय झाली आहे. दरवर्षी सर्वसाधारणपणे जुलै महिन्यात मुंबईत मोठा पाऊस कोसळतो व दोन-तीनदा तरी मुंबई अस्ताव्यस्त होते. पण यावर्षी मान्सूनचा पाऊस तब्बल दोन आठवडे अगोदरच मुंबईत येऊन थडकला. नालेसफाई किंवा संरक्षक भिंती, कचरा सफाईची जी कामे ३१ मे पूर्वी पूर्ण करायची होती, त्या अगोदरच झालेल्या अतिवृष्टीने मुंबईची दाणादाण उडाली. एका दिवसानंतर मुंबईचे जनजीवन सुरळीतही झाले. पण मुंबईला सेवा-सुविधा देणाऱ्या मुंबई महापालिका, एमएमआडीए आदी डझनभर यंत्रणावर टीका होणेही समजण्यासारखे आहे. मुंबईसाठी राबणाऱ्या यंत्रणा अपेक्षेपेक्षा पाऊस अगोदर आला म्हणून आपली जबाबदारी झटकू शकत नाहीत. ज्यांनी पावसाळी कामे पूर्ण केली नव्हती त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे ही मागणीही रास्त आहे. पण मुंबईत जिकडे तिकडे रस्त्यावर व रेल्वे मार्गावर पाणी साचले म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर खापर फोडणे चुकीचे आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील उबाठा सेनेने, त्यांच्या पक्षाच्या मुखपत्राने आणि पक्षप्रमुखांच्या आमदार असलेल्या पुत्राने फडणवीस व शिंदे यांच्या नावाने शिमगा केला व मुंबई ठप्प होण्यास तेच जबाबदार आहेत असा कांगावा केला.

विधानसभा निवडणुकीत जनतेने उबाठा सेनेला त्यांची लायकी काय आहे हे दाखवून दिले आहे. जोपर्यंत उबाठा सेना भाजपाच्या हातात हात घालून निवडणुका लढवत होती तोपर्यंत लोकांनी उबाठा सेनेला भरीव यश दिले. पण ज्यावेळी सत्तेच्या मोहापायी उद्धव ठाकरे यांनी कमळाची साथ सोडून राहुल गांधींना जवळ केले व हातात पंजा घेऊन भाजपावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला तेव्हा मात्र जनतेने त्यांनाच चांगला धडा शिकवला. महाराष्ट्राच्या विधानसभेत महायुतीचे २३५ आमदार आहेत तर महाआघाडीचे पन्नास सुद्धा आमदार नाहीत. सातत्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर असभ्य आणि असंसदीय भाषेत टीका करणाऱ्या उबाठा सेनेचा जनाधार सतत घटत चालला आहे. उबाठा सेनेवरील जनतेचा विश्वास उडाला आहे. उबाठा सेनेतून रोज कुणी ना कुणी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करीत आहे. वास्तवतेचे आणि बदललेल्या परिस्थितीचे भान ठेऊन तरी पक्षप्रमुख व त्यांच्या पुत्राने वागले पाहिजे पण अजूनही शिवसेनाप्रमुखांच्या पुण्याईवरच त्यांचा कारभार चालू आहे असे दिसते.

भाजपाचे वरिष्ठ नेते माजी केंद्रीयमंत्री, माजी मुख्यमंत्री व खासदार नारायण राणे यांनी मंगळवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ठाकरे पितापुत्रांचे वस्त्रहरण केले. मोदी, शहा, फडणवीस यांच्यावर टीका केलीत तर याद राखा, तुमचा भ्रष्टाचाराचा भांडाफोड करू असा सज्जड दम त्यांना दिला. मुंबई महापालिकेत पंचवीस वर्षे सत्ता असताना मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून काय दिवे लावलेत अशा शब्दांत त्यांनी ठाकरे पितापुत्रांना खडसावले. त्या पंचवीस वर्षांत मुंबई भ्रष्टाचारमुक्त का झाली नाही? त्या २५ वर्षांत उबाठा सेनेने मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून ठोस प्रयत्न का केले नाहीत? पावसाळ्यात मुंबई बेटावर मुसळधार पाऊस कोसळत असताना त्याचवेळी समुद्राला भरती असेल, तर मुंबईत सखल भागात पाणी तुंबते हे उबाठा सेनेचे नेतृत्व करणाऱ्यांना ठाऊक नसावे याचे मोठे आश्चर्य वाटते. वरळी येथील आचार्य अत्रे भुयारी मेट्रो स्टेशनमध्ये पावसाचे पाणी घुसले व स्टेशनला तलावाचे स्वरूप आले हे अघटीत घडले. पण त्याला काय फडणवीस व शिंदे हेच थेट जबाबदार आहेत काय? मग या निकषाने कोरोना काळात महाराष्ट्रात दीड लाख लोकांचा मृत्यू झाला, देशात सर्वाधिक मृत्यू महाराष्ट्रात झाले तेव्हा राज्याचे नेतृत्व कुणाकडे होते, हे लोक अजून विसरलेले नाहीत. राज ठाकरे, नारायण राणे, एकनाथ शिंदे, गणेश नाईक, गजानन कीर्तिकर, अशा नेत्यांच्या वलयामुळे व त्यांनी केलेल्या अफाट कामांमुळे शिवसेना विस्तारली. ज्यांनी मुंबई, कोकणात आणि महाराष्ट्रात शिवसेना घराघरांत पोहोचवली ते नेते आज उबाठा सेनेत राहिलेच नाहीत. ज्या दिवशी उद्धव ठाकरे काँग्रेसच्या मदतीने मुख्यमंत्री बनले व त्यांनी स्वत:च्या मुलाला थेट कॅबिनेट मंत्रीपद दिले त्या दिवसापासून शिवसेनेला घरघर लागली व नंतर एकनाथ शिंदेंनी बंडाचा झेंडा फडकावून आपला पक्ष हीच खरी शिवसेना म्हणून सिद्ध करून दाखवले. शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला निवडणूक आयोगाने मान्यता दिलीच पण लोकसभा व विधानसभा निवडणुकीत जनतेनेही त्यावर शिक्कामोर्तब केले. एवढे झाल्यावरही ठाकरे पितापुत्रांचे डोळे उघडले नाहीत. त्यांना जळीस्थळी एकनाथ शिंदे दिसत आहेत. त्यांना मिंधे म्हणून संबोधणे हे महाराष्ट्राच्या जनतेला मुळीच आवडलेले नाही. राज्याच्या माजी मुख्यमंत्र्यांचा व उपमुख्यमंत्र्यांचा उबाठा सेना सतत अवमान करीत आहे, त्याची शिक्षा जनतेच्या न्यायालयात त्यांना वेळोवेळी मिळते आहेच.

मुंबईत दि. २६ जुलै २०२५ रोजी ९४४ मिमी पाऊस पडला होता. तेव्हा मुंबईचे जनजीवन ठप्प झाले होते, त्यातूनही मुंबई दोन-तीन दिवसांत बाहेर आली. तेव्हा मुंबई पाण्यात असताना उद्धव ठाकरे यांना आपला वाढदिवस पंचतारांकित हॉटेलमध्ये करायचे सुचले तरी कसे? उबाठा सेना आता त्यांच्या कर्माने विरोधी पक्षात आहे. विधानसभेत साधे विरोधी पक्षनेते पदही या पक्षाला मिळालेले नाही. चार-पाच महिन्यांवर महापालिका निवडणूक आहे. पंचवीस वर्षे मुंबई महापालिकेतील सत्ता हाच उबाठा सेनेचा आणि मातोश्रीचा श्वास होता. गेल्या तीन वर्षांपासून महापालिकेच्या प्राणवायूला उबाठा सेना मुकली आहे, त्यातूनच त्यांच्या पक्षाला गळती लागली आहे. केवळ मोदी, शहा, फडणवीस व शिंदे यांच्यावर बेलगाम व बेताल टीका करून पक्षाला सत्ता तर मिळणार नाहीच पण जो पक्ष थोडाफार शिल्लक आहे तोही टिकणार नाही. फडणवीस-शिंदेंवर सतत टीका करण्यापेक्षा आपले घर वाचविण्याचा प्रयत्न पक्षप्रमुख व त्यांच्या पुत्राने करावा...

# खडकवासला ग्रामीण भाजपातर्फे तिरंगा रॅली यशस्वी

## देश प्रेमी कार्यकर्त्यांचा उत्साह



**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**
भारतीय जनता पार्टी खडकवासला ग्रामीणच्या वतीने ऑपरेशन सिंदूर च्या यशानंतर तिरंगा यात्रेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

आमदार भीमराव अण्णा तपकिर यांच्या नेतृत्वाखाली तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले.

ऑपरेशन सिंदूर च्या यशानंतर देशभरात व महाराष्ट्रात तिरंगा यात्रेचे आयोजन होत असून त्या अनुषंगाने खडकवासला मतदार संघाच्या वतीने डोणजे येथे शेकडो कार्यकर्ते व ग्रामस्थ यांच्या वतीने डोणजे चौक ते राम मंदिर पर्यंत भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये भीमराव अण्णा तापकीर यांच्या नेतृत्वात या तिरंगा रेल्वेचे आयोजन करण्यात आले .

या रॅलीमध्ये माजी सैनिक सुभेदार मेजर सुनील सहाने भगवान पायगुडे उत्तम करंजावणे शिवाजी लायगुडे राजू पारगे नवनाथ ढमढेरे आणि सद्यस्थितीत कार्यरत असलेले डोणजे गावचे सुपुत्र मेजर संतोष पायगुडे यांच्या मातोश्री कुसुम पायगुडे यांचा सत्कार शाल व तिरंगा देऊन करण्यात आला. यावेळी भाजपा पश्चिम हवेली अध्यक्ष नवनाथ जी तागुंदे दिव्यांग विकास आघाडी पश्चिम महाराष्ट्र बाजीराव पारगे सरपंच विठ्ठल ठाकर माजी सरपंच लाला शेठ जावळकर, दत्ताभाऊ पायगुडे नंदूशेठ जावळकर नवनाथ मोकर सुनील मांढरे बाळासाहेब चव्हाण राजू भामे दत्ता दबडे दिलीप पायगुडे सरपंच संतोषी दा रवटकर मोहन पायगुडे आदी कार्यकर्ते तरुण वर्ग सहभागी होते. त्याचप्रमाणे पहलगाम येथे आपले महाराष्ट्रातील पर्यटक जात धर्म विचारून मारले गेले आपल्या पुण्यातील संतोष जगदाळे आणि कौस्तुभ गणबोटे हेही मारले गेले त्यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**केंद्र सरकारच्या खंबीर नेतृत्व, व सैन्याची जिद्द मुळे ऑपरेशन सिन्दुर यशस्वी :** यावेळी बोलताना खडकवासला भाजपा पदाधिकाऱ्यांनी मत व्यक्त केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील खंबीर सरकारने दहशतवादी कारवायांविरुद्ध कठोर निर्णय घेतले. व आपल्या भारतीय शूर जवानांच्या प्रयत्नांनी ऑपरेशन सिन्दुर यशस्वी झाले ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे.

भारताकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्या कोणत्याही प्रवृत्तींना वेळोवेळी ठेचले जाईल असे खंबीर सरकार आपल्याला मिळाले आहे. राष्ट्र प्रेमाने प्रेरित होऊन आपण सर्वांनी तिरंगी यात्रेत सहभागी झाले असे मत यावेळी दिव्यांग विकास आघाडी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बाजीराव पारगे, खडकवासला भाजपा ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे यांनी व्यक्त केले.

# मुस्लिम धर्म स्थळांवर एकतर्फी कारवाई नको : मुस्लिम शिष्टमंडळाची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
केवळ हिंदुत्ववाद्यांचा अट्टाहास पुरवण्यासाठी मुस्लिम धर्मस्थळावर केली जाणारी एकतर्फी कारवाई अन्यायकारक असून अशा प्रकारच्या कारवाईला कायदेशीर विरोध केला जाईल. तसेच यासंदर्भात लवकरच आंदोलन देखील उभारले जाईल, असा स्पष्ट इशारा पुणे महानगरपालिकेची माजी नगरसेवक गफूर पठाण यांनी आज पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना दिला.

पुणे शहरातील विविध भागांमध्ये मज्जित, मदरसा व दर्ग्यांवर पुणे महानगरपालिकेच्या वतीने कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई धर्मनिरपेक्षपणे केली जात नसल्याने तातडीने थांबवण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन नॅशनल कॉन्फरन्स फॉर मायनॉरिटीच्या वतीने शिष्टमंडळाद्वारे पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले व नगर अभियंता प्रशांत वाघमारे यांना देण्यात आले. यावेळी नॅशनल कॉन्फरन्स फॉर



मायनॉरिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष राहुल डंबाळे, माजी नगरसेवक अ‍ॅड. आयुब शेख, माजी नगरसेवक रफिक शेख, माजी नगरसेवक गफूर पठाण, काँग्रेस पक्षाचे नेते महबूब शेख यांच्यासह मोहसिन शेख,रफीक शेख, महबूब नदाफ,जावेद खान, शहाबुद्दीन शेख, जावेद शेख, किसान जाफरी, रौफ शेख इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

दरम्यान, शहरांमध्ये दहा हजार पेक्षा अधिक धार्मिक स्थळे अनधिकृत आहेत. मात्र केवळ मुस्लिम धर्मस्थळावरच कारवाई करणे ही कायद्यातील असमानता दर्शवणारी बाब असून हा मुस्लिमांवरील धार्मिक अत्याचार असल्याने तो तातडीने थांबवण्यात यावा अशी भूमिका राहुल डंबाळे यांनी मांडली आहे.

तसेच सर्वोच्च न्यायालय व राज्य शासनाच्या निर्देशानुसार नियमित होणाऱ्या धार्मिक स्थळांना नियमित करावे व कोणत्याही धार्मिक स्थळांवर कारवाई करू नये; अशी भूमिका ज्येष्ठ नगरसेवक आयुब शेख यांनी मांडली

देशात तणावाची परिस्थिती असताना संपूर्ण देश धार्मिक शक्ती विरोधात एकत्रित येत आहे. असे असताना भारतीय जनता पक्ष मात्र धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण करत असेल व त्यासाठी ते मंदिर - मशीद असा वाद करत असतील तर ते निंदाजनक असल्याचे रफिक शेख यांनी सांगितले तर कारवाई करताना कोणताही धर्म न पाहता कारवाई करणे अपेक्षित असताना; प्रशासन मात्र अत्यंत चुकीची भूमिका घेत कारवाई करत आहे. या विरोधात प्रसंगी न्यायालयीन लढाई देखील लढली जाईल अशी माहिती यावेळी महबूब नदाफ यांनी घेतली आहे.




# धायरी नांदेड परिसरात तिरंगा यात्रा यशस्वी..!

## तिरंगा रॅली व राष्ट्रभक्तीच्या घोषणांनी परिसर दुमदुमला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वी मोहिमे नंतर देशभरामध्ये राष्ट्रभक्तीचा उत्साह संचारलेला दिसत आहे. ह्या निमित्त राज्यभरामध्ये तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात येत आहे. भारतीय जनता पार्टी खडकवासला मतदार स संघाच्या वतीने (धायरी-वडगाव बु मंडल) व (नांदेड-शिवणे मंडल ) आयोजित तिरंगी यात्रेचे आयोजन करण्यात आले. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद देत धायरी व नांदेड परिसरातील नागरिकांनी राष्ट्रभक्तीचे दर्शन घडविले. धायरी बसस्टॉप ते नांदेड सिटी सर्कल या मार्गावर 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भाग घेणाऱ्या वीर भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी आणि त्यांच्या मनोबलासाठी भव्य 'तिरंगा दुचाकी रॅली' काढण्यात आली. यामध्ये धायरी,गणेशनगर ,गारमाळ,नांदेड व आजूबाजूच्या परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. या यात्रेच्या माध्यमातून, दहशतवाद्यांना सडेतोड प्रत्युत्तर देणाऱ्या आपल्या सैन्य दलाचे आणि आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या दृढ नेतृत्वाचे कौतुक करण्यात आले. 'ऑपरेशन सिंदूर' हे भारताच्या सैन्यशक्तीचे प्रतिक आहे .धाडस, देशभक्तीने प्रेरित झालेल्या या मोहिमेबद्दल उपस्थित सर्व मान्यवरांनी कौतुक केले. या राष्ट्रभक्तीने भारलेल्या प्रसंगी माजी नगरसेवक राजाभाऊ लायगुडे, मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे, अध्यक्ष रुपेश घुले पाटील, खडकवासला विधानसभा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे, सामाजिक कार्यकर्ते किशोरभाऊ पोकळे यांनी युवा मोर्चाचे सारंग नवले, ओबीसी मोर्चाचे अतुल चाकणकर , सचिन मोरे,विशाल कदम, महिला आघाडीच्या रश्मीताई घुले, रोहिणी ताई राणी सुवर्णताई जाधव सुजित कारले प्रतीक लायगुडे ,आकाश कामटे समीर रायकर व कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पाकिस्तान मुर्दाबाद !भारत माता की जय!! व दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानचा निषेध व्यक्त करण्यात आला. विविध देशभक्तीपर घोषणां देत तिरंगा यात्रेची सांगता झाली.

# थोडक्यात



## धायरीतील रस्त्यावरील राडारोडा उचलला; पोकळे यांचा पाठपुरावा


**धायरी (आरंभ पर्व) : बऱ्याच दिवसापासून खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे या पावसामध्ये धायरी गाव मधील धारेश्वर मंदिर परिसरामधील टॅमरिंड पार्क, पोकळे पाटील वस्ती या ठिकाणी जाणाऱ्या रोडवरती मोठ्या प्रमाणावर पावसाने वाहून आलेला राडा रोड वाळू माती खूप मोठ्या प्रमाणात साचले होते त्यामुळे नागरिकांना येता जाता त्रास सहन करावा लागत होता. ही गोष्ट खडकवासला भाजपा सरचिटणीस बापूसाहेब पोकळे यांनी जाणून घेतली. व तात्काळ पुणे महानगरपालिकेशी संपर्क साधला. व तात्काळ उपाययोजना करण्यासाठी सूचित केले. त्यानंतर महानगरपालिकेच्या जेसीबी मशीन द्वारे व पोकळे यांनी स्वतःचा डंपर लावून हा राडा रोड उचलून घेण्यात आला. व नागरिकांचा मार्ग मोकळा करण्यात आला. परिसरातील नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले.**




## भाजपा महिला मोर्चाच्या वतीने शिवाजीनगर कोर्ट येथे आंदोलन

**पुणे (आरंभ पर्व) : नुकतीच हगवणे ह्या महिलेचा होण्यासाठी शारीरिक व मानसिक छळ तिच्या सासरच्या मंडळीकडून करण्यात आला. तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याबद्दल तिच्या कुटुंबीयाविरुद्ध गुन्हे दाखल करून तिला न्याय मिळावा या मागणीसाठी भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा पुणे यांच्या वतीने भव्य आंदोलन करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष स्नेहलताई दगडे, शहराध्यक्ष हर्षदाताई फरांदे सरचिटणीस आरतीताई कोंढरे,उज्वलाताई गोड सौ भावनाताई शेळके, मंडलध्यक्ष स्नेहलताई गोरे मंडल अध्यक्ष महिला मोर्चा रश्मीताई घुले सरचिटणीस सायली ताई भोसले तेजस्विनी शिरोडकर उपाध्यक्ष सुप्रिया करमरकरसचिव स्वाती चिटणीस स्मिता रासकर अश्विनी कोठाळेकर आदी कार्यकर्त्या उपस्थित होत्या.**

## भीम नगर वासीयांची फसवणूक होऊ देऊ नका : SRA अधिकाऱ्यांना आदेश



**पुणे (आरंभ पर्व) : एरंडवणे येथील भीम नगर झोपडपट्टी चे एसआरए अंतर्गत पुनर्वसन योजनेत झोपडपट्टी धारकांची कोणतीही फसवणूक होऊ देऊ नका, गरज पडल्यास नागरिकांना अधिकच्या सुविधा द्याव्यात किंवा संपूर्ण स्कीम रद्द करावी असे आदेश उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण चे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे यांना दिले आहेत. भीम नगर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत फसवणूक व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत, मूळ जागेपासून नऊ किलोमीटर लांब सक्तीचे स्थलांतर अमान्य करत झोपडपट्टी धारकांनी या विरोधात गेल्या काही दिवसांपासून आंदोलन पुकारलेले आहे. या संदर्भात त्यांनी नुकतेच मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चा नेला होता. या बिऱ्हाड मोर्चाच्या पार्श्वभूमीवर आज चंद्रकांत पाटील व झोपडपट्टी धारकांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन कोणत्याही परिस्थितीत झोपडपट्टी धारकांची फसवणूक होणार नाही, याबाबत आपण सर्व ती काळजी घेऊ असे आश्वासन त्यांनी झोपडपट्टी धारकांना दिले. तसेच झोपडपट्टी धारकांच्या हिताच्या दृष्टिकोनातून सदर पुनर्वसन प्रक्रियेमध्ये झोपडपट्टी धारकांना अधिक लाभ देण्यात यावा अथवा फसवणूक झाली असल्यास संपूर्ण योजना रद्द करावी असे आदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण चे मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश गटणे यांना चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत.**

## थोडक्यात



### भव्य रक्तदान शिबिर व आरोग्य शिबिर धायरी येथे संपन्न


धायरी (आरंभ पर्व) : दिनांक 9/5 रोजी श्री धारेश्वर महादेव संस्थान, श्रीमंत धारेश्वर तरुण मंडळ, समस्त धायरी ग्रामस्थ यांच्या वतीने परम शिवभक्त जैतुजीबाबा महाराज रायकर समाधी स्थळ मारुती मंदिर धायरी सिंहगड रोड या ठिकाणी जाईतुजीबाबा महाराज संजीवन समाधी सोहळा वर्धापन दिन यानिमित्ताने भव्य रक्तदान शिबिर मोफत रक्त तपासणी, डोळे तपासणी,बीपी शुगर, दंत तपासणी व उपचार, मोफत हृदय तपासणी,ॲक्युप्रेशर थेरोपी आदी सर्व प्रकारच्या तपासण्या मोफत करण्यात आल्या . सर्व नागरिकांसाठी भक्तांसाठी संध्याकाळी महाप्रसादाचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात आले होते.याचा लाभ ग्रामस्थ व जेष्ठ नागरिक माता भगिनी यांनी मोठ्या प्रमाणामध्ये माता भगिनी घेतला जैतू जी बाबा महाराज यांच्यावर मोठ्या प्रमाणात श्रद्धा आहे . दरवर्षी त्यांच्या समाधी स्थळावर अशा प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात सध्या युद्धजन्य परिस्थितीमध्ये या रक्तदान शिबिराला महत्त्व प्राप्त झाले होते. यामध्ये 105 रक्त पिशव्या संकलित करण्यात आल्या .पुणे रक्तपेढी यांच्या वतीने त्यांचा सर्व स्टाफ व डॉक्टर सर्वांनी अतिशय चांगले रीतीने हे रक्तदान शिबिर पार पडण्यास मोलाचे सहकार्य लाभले. देसाई हॉस्पिटल मंमदवाडी व सिल्वर बर्च हॉस्पिटल यांचे सहकार्य लाभले . यावेळी सामाजिक कार्यकर्ते दिलीप रायकर, तानाजी कांबळे याच प्रमाणे प्रमोद रायकर, सोमनाथ रायकर, शंकर रायकर, अनिल रायकर, देविदास रायकर सुनील रायकर,चंद्रकांत रायकर, लालचंद रायकर जयसिंग गव्हाणे व श्री धारेश्वर संस्थान श्री धारेश्वर तरुण मंडळ व धायरी ग्रामस्थ यांच्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वी करण्यात आला .यावेळी प्रमाणात ग्रामस्थ,नागरिक, भक्त उपस्थित होते.

### "कास्ट फ्रेंडशिप प्रीमियर लीग" नावाने होणार जगात पहिल्यांदा स्पर्धा




पुणे (आरंभ पर्व) : चेंज इंडिया फाउंडेशन यांच्यावतीने कास्ट फ्रेंडशिप प्रीमियर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ह्याबाबत पुणे पत्रकार संघामध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना आयोजक सचिन धनकुडे यांनी विस्तृतपणे स्पर्धेविषयी माहिती दिली. अनेक वर्षांपासून मला एक प्रश्न नेहमी पडत होता की, भारताच्या अंतर्गत सर्वात मोठी सामाजिक समस्या अशी कोणती आहे की, ज्या समस्येमुळे भारतीय-भारतीयांमध्येच द्वेष भावना वाढीस लागली जात आहे, जिची वाढ दिवसेंदिवस वाढत आहे, भविष्यात जिचे स्वरूप भयानक होणारनं आहे, एकमेकांना नागरिक भेदभावाच्या नजरेतून पाहिल जात आहे, जनता त्रस्त झाली आहे? तसेच या समस्येपुढे सर्व जण हतबल झाले आहेत. तर त्याचे उत्तर मला जातीवाद ही अनेक असे वाटते. यामध्ये आपल्याच जातीतल्या माणसांकडून खरेदी करा, आपल्याच जातीच्या माणसांना मोठे करा, आपल्या जातीचा गुन्हेगार असेल तरी त्यावर पांघरूण घाला, दुसऱ्यांच्या जातीतील एखादा निरपराध असेल तरी त्याला तो दोषीच आहे हे ठरवण्याची मोहिमच चालू होते, आपल्या जाती धर्माचा स्वाभिमान असणे एक वेळ ठिक आहे पण त्या स्वाभिमानातुन दुसऱ्यांच्या जातीचा दुस्वास, तिरस्कार करण्याचे प्रमाण समाज्यात तर वाढतच चालले आहे. पण हा दुषप्रचार फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप या सोशन मिडियाच्या माध्यमातून हा भस्मासूर दिवसेंदिवस सर्वात जास्त व किळसवाण्या पध्दतीने त्या-त्या जातीच्या संघटनांकडून व नेत्यांकडून चालू आहे. कारण त्यावरच त्यांचं नेतृत्व टिकून आहे. जाती-जातीचा प्रभाव त्यांच्या नेत्यांचा प्रभाव समाजातील सर्व घटकांवर वाढत चालला आहे. यावर कोणी मोठ्या प्रमाणात बोलत नाही, लिहित नाही, वेगळी मोहिम घेत नाही. लिहले, बोलले तरी त्याचा प्रभाव पाहिजे तसा समाज्यावर, प्रशासनावर, सरकारवर पडत नाही. जो व्यक्त होतो तोच वाईट ठरतो. त्यामुळे जातीयेतेच्या दुष्परिणाम वर कोणी मोठ्या प्रमाणात बोलतच नाही, व्यक्तच होत नाही. सरकार व विरोधी पक्ष, राजकीय पक्ष तर जातीय समीकरणे आखून जातीय द्वेषाला खतपाणीच घालत आहे. असेही सचिन धनकुडे यांनी पत्रकार परिषदेमध्ये म्हटले आहे.

# सीएसआर उपक्रमांना चालना देण्यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील आघाडीचा व्यावसायिक समूह आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची पितृकंपनी असलेल्या मलाबार समूहाने २०२५-२६ मध्ये आरोग्यसेवा, शिक्षण, भूक आणि गरिबी निर्मूलन, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संरक्षण आणि वंचितांसाठी घरे यावर लक्ष केंद्रित करून त्यांच्या सामाजिक दायीत्व अर्थात सीएसआर उपक्रमांना चालना देण्यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

'द हंगर फ्री वर्ल्ड' या त्यांच्या प्रमुख सीएसआर उपक्रमांतर्गत, समूहाने भारत आणि झांबियामध्ये दररोज ७०,००० अन्न पाकिटे वंचितांना वितरित करण्याचे वचन दिले आहे, ज्याचे प्रमाण २०२५-२६ मध्ये एकूण २.५० कोटी अन्न पाकिटांवर जाणार आहे. मागील ३ वर्षात २.५ कोटी अन्न पाकिटे वितरित करण्यात आल्याच्या समूहाच्या एकत्रित कामगिरीच्या तुलनेत ही एक महत्त्वपूर्ण झेप दर्शविते आणि वंचित समुदायांसाठी अन्न सुरक्षेच्या उद्दिष्टाप्रती समूहाच्या अधिक दृढ वचनबद्धतेला अधोरेखित करते. हा उपक्रम संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास ध्येय २ - शून्य भूक याच्याशी सुसंगत आहे.

जागतिक भूक दिनानिमित्त, २८ मे २०२५ रोजी नवी दिल्लीतील जनपथ येथील डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात आयोजित एका कार्यक्रमात, निती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जी-२० शेर्पा डॉ. अमिताभ कांत यांनी समूहाच्या सीएसआर कार्यक्रमांच्या पुढील टप्प्याची विधिवत सुरुवात केली. याप्रसंगी उपस्थित इतर मान्यवरांमध्ये मलाबार समूहाचे अध्यक्ष श्री. एम.पी. अहमद; मलबार समूहाचे उपाध्यक्ष श्री. के.पी. अब्दुल सलाम आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सच्या भारतातील कारभाराचे व्यवस्थापकीय संचालक श्री. ओ. आशर यांचा समावेश होता.

या उपक्रमावर भाष्य करताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष एम.पी. अहमद म्हणाले, "सीएसआर हा मलाबार समूहामध्ये आमच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनला आहे आणि आम्ही समाजाला परतफेड करण्यावर विश्वास ठेवतो. आम्ही २८ मे हा आमचा वार्षिक सीएसआर दिवस म्हणून साजरा करत असतो; जो आमच्या सातत्यपूर्ण आणि प्रभावी कृतीद्वारे वंचितांच्या पाठीशी उभे राहण्याच्या आमच्या प्रतिज्ञेची पुष्टी करतो.

आमचे सीएसआर उपक्रम त्या चिरस्थायी वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहेत. आम्ही आमचे सर्वोत्तम प्रयत्न करत असताना, अधिकाधिक संस्था या मोहिमेत सामील झाल्यास मोठा परिणाम साध्य केला जाऊ शकतो.

हंगर फ्री वर्ल्ड प्रकल्प सध्या भारत आणि झांबियामध्ये दररोज ७०,००० अन्न पाकिटे वितरित करतो. भारतात, २० राज्यांमधील १६७ केंद्रांद्वारे दररोज ६०,००० हून गरजूंना अधिक पोषक तत्वांनी समृद्ध जेवण दिले जाते. झांबियातील तीन शाळांमधील १०,००० विद्यार्थ्यांना दररोज जेवण देण्यासाठी झांबिया सरकारशी समूहाकडून सहकार्य केले गेले आहे. हंगर फ्री वर्ल्ड प्रकल्प आधुनिक सुविधांनी सुसज्ज आणि प्रशिक्षित पाककला तज्ञ आणि स्वच्छता-जागरूक कर्मचारी असलेल्या अत्याधुनिक स्वयंपाकघरांचे संचालन करतो.

शैक्षणिक आणि सामाजिक कल्याणकारी उपक्रमांतर्गत, मलाबार समूहाने संपूर्ण भारतात ७१६ सूक्ष्म-शिक्षण केंद्रे स्थापन केली आहेत, जी रस्त्यावरील मुलांच्या प्राथमिक शिक्षण आणि पोषणाची काळजी घेतात.

३२,००० हून अधिक मुलांची या उपक्रमांतर्गत नोंदणी केली गेली आहे, त्यापैकी ९,००० आधीच औपचारिक शाळांमध्ये समाविष्ट आहेत. हा प्रकल्प थानल या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने चालवला जात आहे. याव्यतिरिक्त, १,१४,००० मुलींना त्यांच्या शिक्षणाला पाठिंबा देण्यासाठी समूहाकडून शिष्यवृत्ती देण्यात आली आहे.

## स्पर्धापरीक्षेतील अपयशाने युवकाची आत्महत्या

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरूनगर शहरालगतच्या राक्षेवाडी (ता. खेड) येथे एका २७ वर्षीय युवकाने इमारतीच्या अकराव्या मजल्यावरुन उडी घेऊन आत्महत्या केली. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. ऋषिकेश शांताराम राक्षे (वय २७, रा. बहिरवाडी, ता. खेड) असे आत्महत्या करणाऱ्या युवकाचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऋषिकेश राक्षे हा स्पर्धापरीक्षांचा अभ्यास करत होता. त्यात त्याला अपयश येत असल्याने तो मानसिक तणावात होता. तो राजगुरुनगर शहराजवळच्या राक्षेवाडी येथे नातेवाईकांकडे आला होता.



नातेवाईक राहत असलेल्या सोसायटी लगतच नवीन बहुमजली इमारतीचे बांधकाम सुरू आहे. याच इमारतीच्या अकराव्या मजल्यावरून ऋषिकेशने उडी मारली. उंचावरुन वेगाने जमिनीवर आदळल्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. स्थानिक रहीवाशांनी पोलिसांना या घटनेची माहिती दिली.

## सेवा रस्ता पाण्याखाली गेल्याने वाहतुक ठप्प

- **पर्यायी व्यवस्थेकडे ठेकेदाराचे दुर्लक्ष**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

लादवड (ता. खेड) गावाजवळ पुलाच्या संथ कामामुळे नव्याने बनवण्यात आलेल्या तात्पुरत्या सेवा रस्त्यावर पावसाचे पाणी साठले. त्यामुळे पश्चिम भागातील शिरोली ते पाईट रस्ता बंद झाला आहे. परिणामी सुमारे २० गावांकडे जाणारी वाहतूक पर्यायी मार्गाने पिंपरी बुद्रुक गावातून वळवली आहे. मागील जवळपास सात महिन्यांपासून पाईट-आंबोली जिल्हा मार्ग क्र. १६ वर लादवड गावाजवळ नवीन पुलाचे काम सुरू आहे. हे काम ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे अत्यंत संथगतीने सुरू असून गेल्या आठवडाभरापासून पडत असलेल्या



**किरण खुडे**

मुसळधार पावसाने हा सेवा रस्ता पाण्याखाली गेला आहे. काही ठिकाणी हा रस्ता खचून त्यावर मोठ्या प्रमाणावर तळ्याप्रमाणे पाणी साठले आहे. त्यामुळे लादवड गावाकडे जाणारी वाहतूक पिंपरी बुद्रुक गावातून वळवण्यात आली आहे. त्यामुळे दुचाकी, चारचाकी वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. काही दिवसांपासून बांधकाम विभागाचे अधिकारीदेखील पावसामुळे अडचण होईल, असे ठेकेदाराला अनेकदा सांगूनदेखील ठेकेदार त्यांना दाद देत नसल्याचे समजते. या रस्त्याबाबत ठेकेदाराकडून वेळकाढूपणा सुरू असून, जोरदार पाऊस झाल्यास रस्त्याची पर्यायी व्यवस्था करणे गरजेचे होते. मात्र याकडेही ठेकेदाराने दुर्लक्ष केले. त्यामुळे पाईट-आंबोली रस्त्यावरील २० गावांच्या ग्रामस्थांना नाहक त्रास होत आहे. याबाबत प्रशासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणी नागरीकांकडून होत आहे.

## लेनोवो इंडियातर्फे व्यवसायांना स्मार्ट एआय सह पाठबळ

- **भारतातील एंटरप्राईज परिवर्तनासाठी उपकरणे, सेवा व उपाय हा आपला संच प्रदर्शित**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक तंत्रज्ञानातील आघाडीची कंपनी असलेल्या लेनोवो ने आज आपला पूर्ण व्यावसायिक पोर्टफोलिओ प्रदर्शित करत स्मार्टर एंटरप्राईज परिवर्तनाला बळकटी देण्याची आपली वचनबध्दता दर्शविली. या कार्यक्रमात लेनोवोने एआय संचालित उपकरणांच्या थिंक पोर्टफोलिओ वर लक्ष्य केंद्रित करत यामध्ये नवीन थिंकपॅड एक्स9 14 ऑरा एडिशन यासह डिजिटल वर्कप्लेस सोल्युशन्स (डीडब्ल्यूएस),डिव्हाईस ॲज अ सर्व्हिस (डीएएएस),ट्रूस्केल व एआय चलित सोल्युशन समाविष्ट असलेले एंडटूएंड सेवा प्रदर्शित केल्या.



लेनोवो थिंक पोर्टफोलिओ आपली कामगिरी,विश्वासार्हता आणि सुरक्षिततेवर लक्ष केंद्रित करत एंटरप्राईज कॉम्प्युटींगमध्ये प्रामुख्याने कार्यरत आहे.या कार्यक्रमात नवीन थिंकपॅड एक्स9 14 ऑरा एडिशन प्रदर्शित करण्यात आले.हे आधुनिक कामाच्या ठिकाणी एंटरप्राईज - ग्रेड वैशिष्ट्यांसह आणि स्मार्ट सिस्टिम व्यवस्थापन आणि सहकार्यासाठी एकात्मिक एआय समर्थनाच्या उद्देशाने बनवले गेले आहे.

शाश्वततेला समोर आणि केंद्रस्थानी ठेऊन नवीन थिंक डिव्हाईसेसमध्ये पुर्नवापर केलेले साहित्य, प्लास्टिकमुक्त एफएससी प्रमाणित पॅकेजिंग आणि उर्जा कार्यक्षम कॉंपोनंटसचे एकत्रीकरण असून लेनोवोच्या 2025 च्या वर्तुळाकार अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे. लेनोवो इंडियाच्या एंटरप्राईज बिझनेसचे कार्यकारी संचालक रोहित मीधा म्हणाले की,आजच्या कंपन्या विश्वासार्ह भागीदारांच्या शोधात आहेत.जे एआयचा वापर करण्यास,आयटी व्यवस्थापन सुलभ करण्यास आणि शाश्वत विकासाला चालना देण्यामध्ये मदत करू शकतील. लेनोवोमध्ये थिंकपॅड ऑरा सारखे एआय संचलित उपकरणे,अधिक स्मार्ट सेवा आणि व्यापक सोल्युशन्स समाविष्ट असलेला आमचा पूर्ण संच ग्राहकांच्या विकसित होत असलेल्या एआय संदर्भातील गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाईन केले गेले आहे. लेनोवोज् सोल्युशन्स ॲन्ड सर्व्हिसेस ग्रुप (एसएसजी) हे कंपन्यांना आयटी व्यवस्थापन सुलभ करण्यास आणि भविष्यासाठी सज्ज डिजिटल कार्यस्थळे विकसित करण्यामध्ये सक्षम करते. डिजिटल वर्कप्लेस सोल्युशन (डीडब्ल्यूएस) हा एक व्यवस्थापित सेवा संच असून रिमोट, हायब्रीड आणि ऑनसाईट कार्य परिसंस्थांना पाठबळ देतो.प्रमुख सेवांमध्ये डिव्हाईस लाईफ सायकल व्यवस्थापनासाठी डिव्हाईस ॲज अ सर्व्हिस (डीएएएस),स्केलेबल इन्फ्रास्ट्रक्चर ॲज अ सर्व्हिससाठी ट्रूस्केल आणि वैयक्तिकृत तंत्रज्ञान साहाय्यासाठी प्रिमियर सपोर्ट प्लस यांचा समावेश आहे.

## भीमाशंकर आणि भोरगिरी परिसरात मुसळधार पावसाचे थैमान

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील भीमाशंकर आणि भोरगिरी परिसरात रविवारी (दि. २५ ) रात्रीपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसाने थैमान घातले असून संपूर्ण परिसर जलमय झाला आहे. डोंगरकड्यांवरून येणारे ओढे आणि नाले दुथडी भरून वाहत असल्यामुळे नदी-नाल्यांना पूरस्थिती निर्माण झाली आहे. पहिल्याच पावसात भीमानदीला पूर आला असून, नदीवरील बंधारे आणि छोटे पूल पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. काही घरांमध्ये देखील पाणी शिरले असून स्थानिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम प्रशासनाकडून सुरू आहे. भीमा नदीवरील बंधाऱ्यांचे ढापे वेळेवर न उघडल्यामुळे पाणी अनेक गावांमध्ये शिरले. परिणामी, शेतीसह घरांचे आणि जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. असे स्थानिक नागरिकांनी सांगीतले. भात खाचरांमध्ये पाणी साचल्याने भात उत्पादनासाठी तयार केलेली भात खाचरे पूर्णपणे नष्ट झाली आहेत. अनेक ठिकाणी पाण्यामध्ये भातखाचरे वाहुन गेली आहेत. अनेक शेतकऱ्यांची शेतातील घरे आणि जनावरांचे गोठेही पाण्याखाली गेले आहेत. काही भागात पशुधनाची अतिवृष्टीमुळे वाताहत झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सोमवारी (दि. २६) पहाटे चार वाजण्याच्या सुमारास पावसाचे प्रमाण वाढल्याने भोमाळे येथील ज्ञानेश्वर बाळु आसवले, कविता ज्ञानेश्वर आसवले यांच्या घरात पाणी आले होते. घरात पाच फुटांपर्यंत पाणी साचल्याने घरातील धान्य, जीवनावश्यक वस्तु भीजुन मोठे नुकसान झाले आहे, घरातील २५ कोंबड्या वाहुन गेल्या व आठ - दहा कोंबड्या मृत झाल्या. गोठ्यातील जनावरे पाण्याखाली गेली होती. प्रसंगावधान राखत त्यांनी जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवले. नामदेव बाळु आसवले यांची कांद्याची आरण, शेतातील पाईप व जनावरांचा चारा वाहून गेला.

# सोमय्या विद्याविहार युनिव्हर्सिटीतर्फे प्रवेश प्रक्रिया सुरू

## १०० हून अधिक अंडरग्रॅज्युएट प्रोग्राम्समध्ये भविष्यासाठी सज्ज करणारे पर्याय उपलब्ध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सोमय्या विद्याविहार युनिव्हर्सिटी (एसव्हीयू ), मुंबई ही एक अत्यंत प्रगतीशील आणि बहूविध शिक्षण देणारी खासगी संस्था आहे. या संस्थेतर्फे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अंडरग्रॅज्युट पोग्राम्ससाठी आता प्रवेश अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. विविध क्षेत्रांसाठीच्या आघडीच्या १०० हून अधिक प्रोग्राम्स आणि सहजसोप्या प्रवेशफेऱ्यांसह एसव्हीयू विद्यार्थ्यांना शैक्षणिक उत्कृष्टता आणि उद्योगक्षेत्रांशी संबंधित जागतिक अनुभव यासह करिअरमध्ये सकारात्मक बदल घडवणारी शैक्षणिक प्रक्रिया देऊ करते. संस्थेतील अर्ली ॲडमिशन ॲप्लिकेशनसाठीची अंतिम तारीख ३१ मे २०२५ आहे




मुंबईसारख्या उत्साही शहरात मोक्याच्या ठिकाणी वसलेले, ८० वर्षांचा शैक्षणिक उत्कृष्टतेचा वारसा सांगणारे एसव्हीयू उच्च शिक्षणातील नाविन्यपूर्णतेसाठी कायमच अग्रणी राहिले आहे. सखोल शिक्षण, उत्कृष्ट सोयीसुविधा, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि उत्साही दमदार कॅम्पस जीवन यातून हे विद्यापीठ भविष्यासाठी सज्ज असे ग्रॅज्युएट घडवण्यासाठी ओळखली जाते.

"प्रत्येक विद्यार्थ्याला सखोल विचार करणे, ठळकपणे नाविन्यता मांडणे आणि तत्व जपत नेतृत्व करण्यासाठी शिक्षणाने सज्ज करावे यावर सोमय्या विद्याविहार युनिव्हर्सिटीमध्ये आमचा कायमच विश्वास आहे. आमच्या एकात्मिक, समग्र दृष्टिकोनामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच भविष्याला नवा आकार देण्याची दृष्टी आणि कौशल्ये विकसित करता येतील, याची खातरजमा होते. या उत्साही, सर्वसमावेशक आणि जगाशी जोडल्या जाणाऱ्या शैक्षणिक समुदायाचा भाग होण्यासाठी आम्ही सर्व इच्छुक उमेदवारांना आमंत्रित करत आहोत," असे एसव्हीयूचे कुलगुरू आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) माजी अध्यक्ष प्रा. व्ही.एन. राजशेखरन पिल्लई म्हणाले.

प्रत्येकाच्या आवडीनुसार बहूविध शैक्षणिक शाखा विद्यार्थ्यांना अंडरग्रॅज्युएट अभ्यासक्रमांमध्ये इंजिनीअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी (बीटेक/ऑनर्स (सर्व स्पेसिलायझेशनमध्ये), ड्युएल डिग्री: बीटेक+ एमएस, मुंबई (३.५ वर्षं) + न्यूयॉर्क, यूएसए (१.५ वर्षं), कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट: (बीबीए, बीबीएम, बीकॉम डेटा अनालिस्ट), ह्युमॅनिटीज ॲण्ड सोशल सायन्सेस (बीए लिबरल आर्ट्स, बीएसस्सी इकॉनॉमिक्स, सायकॉलॉजी, जर्नालिझम), प्युअर ॲण्ड अप्लाइड सायन्सेस (बीएसस्सी (बीएसस्सी+एमएसस्सी) बीएस-एमएस इंटिग्रेटे--बीएस्सी डेटा सायन्स, बायोटेक्नॉलॉजी, आयटी आणि क्रिएटिव्ह ॲण्ड प्रोफेशनल स्टडीज: (डिझाइन, म्युझिक, परफॉर्मिंग आर्ट्स, एज्युकेशन आणि इतर बरेच कोर्स चे अनेक पर्याय येथे उपलब्ध आहेत:



# रूपाली चाकणकर

## यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र राज्य महिला आयोग चर्चेच्या केंद्रस्थानी असण्यामागील वास्तव...

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली झाली. आज २०२५ मध्ये त्याला तब्बल ३२ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालखंडात अनेक महिला अध्यक्षा म्हणून कार्यरत होऊन गेल्या. काहींच्या कार्यकाळात आयोग गुप्तपणे काम करत राहिला, काही अध्यक्षा केवळ नावापुरते कार्यसंवहन करत राहिल्या, तर काहींनी प्रयत्न केले तरी त्यांना शासन किंवा यंत्रणांची तांत्रिक साथ लाभली नाही. परंतु गेल्या काही वर्षांत एकच नाव सातत्याने चर्चेत आहे– रूपाली चाकणकर. त्यांचं अध्यक्षपद हे फक्त आयोगापुरतं मर्यादित न राहता, सामाजिक व राजकीय व्यासपीठावरही प्रभाव पाडणारा ठरले आहे. विरोधकांकडून होणाऱ्या टीकेचा मुळ उद्देश काय ? आणि नेमकं चाकणकरच चर्चेत का ? याचं बारकाईने विश्लेषण करणे गरजेचे ठरते.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग– कार्याची रूपरेषा**

राज्य महिला आयोगाची रचना ही महिलांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्यासाठी, त्यांचे हक्क-सुरक्षा अबाधित राखण्यासाठी आणि शासकीय योजनांचे पर्यवेक्षण व कार्यवाहीसाठी करण्यात आली होती. आयोगाकडे महिलांच्या तक्रारींचं निवारण करणं, धोरणात्मक शिफारसी करणं, आणि जनजागृती मोहीम राबवण्याची प्रमुख जबाबदारी असते. परंतु अनेक वर्षं हे आयोग केवळ नाममात्र अस्तित्वात असल्याचा आरोप जनतेतून सातत्याने होत राहिला आहे.

**रूपाली चाकणकर– एक विधायक आणि संघर्षशील कार्यशैली**

रूपाली चाकणकर यांचा कार्यप्रवास महिला आयोगाच्या चौकटीत अडकलेला नाही. त्यांनी आयोगाला राज्यभरातल्या सामान्य महिलांच्या व्यथा जाणून घेण्याचं आणि शासन दरबारी त्यांचा आवाज पोहोचवण्याचं एक प्रभावी माध्यम बनवलं.

**● शब्दांकन ●**

**मा. श्री. भूपेंद्र मुरलीधर मोरे**
**सामजिक कार्यकर्ते,**
**कार्याध्यक्ष, खडकवासला**
**विधानसभा राष्ट्रवादी काँग्रेस**

त्यांनी घेतलेले महिला संवाद, महिला अदालत, मुलाखतींचे आयोजन, ग्रामीण व आदिवासी भागांतील थेट भेटी, संगणकीय तक्रार निवारण प्रणाली यांसारख्या उपक्रमांनी आयोगाला केवळ कागदी संस्था न ठेवता, ते लोकाभिमुख केलं.

**रुपाली चाकणकर यांच्या कार्यकाळातील महत्त्वपूर्ण उपक्रम**

१.महिला संवाद यात्रा – राज्यभरात जिल्हानिहाय दौरे करून महिलांशी थेट संवाद साधला गेला. त्यांच्या समस्या, स्थानिक पातळीवरील पोलिस व यंत्रणांबाबतचा अनुभव जाणून घेऊन त्वरित पावलं उचलण्यात आली. २. संगणक आधारित तक्रार प्रणाली– अनेक महिला आयोगाच्या कार्यालयात येऊ शकत नाहीत हे लक्षात घेऊन ऑनलाइन तक्रार दाखल प्रणालीची सुधारणा केली गेली. जिल्हास्तरीय समुपदेशक आणि कायदेशीर मदत यांचं जाळं विकसित करण्यात आलं. ३. विशिष्ट प्रकरणांतील तत्परता – चाहे ते पुण्यातील सायबर हल्ले असोत, मुंबईतील बलात्कार प्रकरणं असोत, की ग्रामीण भागातील बालविवाह प्रकरणं – चाकणकर यांनी त्वरित हस्तक्षेप करून समाजात विश्वास निर्माण केला. ४. मुलींच्या सुरक्षेसाठी मोहिमा– 'नो मीन्स नो', 'साइबर सुरक्षा जनजागृती', 'कॉलेज फेस्ट्समध्ये महिलांसाठी कार्यशाळा' अशा उपक्रमांनी युवक-युवतींमध्ये लैंगिक संवेदनशीलता वाढवली.

**विरोधकांची टीका– राजकीय की वैचारिक?**



रूपाली चाकणकर यांच्या कार्यपद्धतीमुळे महिला आयोग प्रकाशझोतात आला. हीच गोष्ट विरोधकांना खुपते आहे, असं त्यांच्या समर्थकांचं म्हणणं आहे. विरोधकांच्या मते, चाकणकर यांनी आयोगाच्या अध्यक्षपदाचा उपयोग राजकीय प्रसिद्धीसाठी केला. मात्र प्रश्न असा आहे की, कोणतंही लोकहिताचं पद प्रचाराशिवाय प्रभावी ठरू शकतं का ?

राजकीय भूमिका असणं हे दोष नाही, तर त्याचा दुरुपयोग करणं हेच अडचणीचं ठरतं. चाकणकर यांनी आपल्या भूमिकेतून महिला सुरक्षिततेचा विषय राजकीय चर्चेचा केंद्रबिंदू बनवला, हे त्यांचं यश मानायचं की प्रचार, हे नागरिकांनी ठरवायचं आहे. परंतु त्यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता, तत्परता आणि समाजाभिमुख दृष्टीकोन दिसतो.

**टीकाकारांच्या आक्षेपांची चिकित्सा**

**१.राजकीय पदाचा वापर.?**

हो, चाकणकर या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्या आहेत, परंतु त्यांचं काम केवळ पक्षनिष्ठेपलीकडचं आहे. त्यांनी विविध राजकीय सत्ता असताना महिलांच्या मुद्द्यांवर उघड मतं मांडली आहेत.

**२.माध्यमांमध्ये सतत झळकणं**

माध्यमांशी संवाद हे आजच्या काळात कामाचा भाग बनलेला आहे. अनेक सरकारी अधिकारी व मंत्री सोशल मीडियाचा वापर करतात. महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी चाकणकर यांची प्रसिद्धी एक माध्यम ठरते, हे नाकारता येणार नाही.

**३.पुरुषांविरोधात एकतर्फी कारवाई.?**

काही प्रकरणांमध्ये असा आरोप झाला. पण आयोगाने कोणत्याही तक्रारीवर दोन्ही बाजू ऐकूनच निर्णय दिल्याचं स्पष्ट झालं आहे.

**चाकणकर यांचं नेतृत्व– महिला सक्षमीकरणासाठी निर्णायक**

रूपाली चाकणकर यांनी 'शासन तुमच्या दारी' या विचाराला 'महिला आयोग तुमच्या दारी' असं परावर्तीत केलं आहे. त्यांनी केवळ शहरी महिलांनाच नव्हे, तर अनुसूचित जाती, आदिवासी, मुस्लिम, ग्रामीण, ट्रान्सजेंडर, विधवा, तलाकशुदा अशा विविध स्तरातील महिलांच्या समस्या ऐकून घेतल्या. आयोगाच्या नावाला खरं कार्यरूप देण्याचं काम त्यांनी केलं.

**समाजमनात चाकणकर यांची प्रतिमा**

हक्काची भूमिका घेणारी बाई, थेट बोलणारी अधिकारी, महिला प्रश्नांवर सडेतोड भुमिका घेणारी नेत्री अशी चाकणकर यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक महिलांनी पहिल्यांदाच आयोगाला आपल्या प्रश्नांची दखल घेणारी संस्था म्हणून पाहिलं.

**सध्याचे राजकीय वातावरण आणि महिला आयोग**

सत्तांतरांनंतर आयोगाच्या प्रमुखांची नेमणूक ही अनेकदा राजकीय रंग घेत असते. विरोधकांना वाटणारी असुरक्षितता ही केवळ चाकणकर यांच्या कार्यक्षमतेमुळे आहे, की त्यांच्या लोकप्रियतेमुळे, हे त्यांच्या प्रतिक्रियांतून स्पष्ट होतं. महिलांवर अन्याय होत असताना मौन धारण करणाऱ्या यंत्रणांपेक्षा, सक्रिय भूमिका घेणारी व्यक्ती अधिक परिणामकारक ठरते.

**चाकणकर का चर्चेत.?**

१. त्यांची प्रत्यक्ष मैदानातली उपस्थिती २. प्रत्येक संवेदनशील प्रकरणात सक्रिय सहभाग ३. राजकीय भूमिका असूनही महिलांच्या हक्कासाठी अढळपणे उभं राहणं ४. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पोहोच वाढवणं ५. महिला आयोगाला 'एक्टिविस्ट' चेहरा मिळवून देणं

यामुळेच गेल्या ३२ वर्षांत अनेक अध्यक्षा होऊन गेल्या, परंतु रूपाली चाकणकर यांचं अध्यक्षपद सर्वाधिक चर्चेत आहे. ही चर्चा सकारात्मक की नकारात्मक, याचा निर्णय जनताच करेल, परंतु एक मात्र नक्की– महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने एक वेगळं वळण त्यांच्या कार्यकाळात घेतलं आहे.

अखेरीस एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल– जेव्हा कोणी व्यवस्थेच्या चौकटीत राहून बदल घडवतो, तेव्हा ते टीकेचं लक्ष्य ठरतंच. पण तीच टीका कार्यक्षमतेची पोचपावती असते, हेही विसरता कामा नये. रूपाली चाकणकर यांचं कार्यही त्याच यथार्थतेत समजून घेणं गरजेचं आहे.

**- समाप्त**





दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.